# Model Answer
## Set- I
**Std. – 10th MM/Semi**
**Subject – Geography**

MS-CIT आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स

MKCL KLiC Courses — Gateway to Knowledge Lit Careers

**प्र.१ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) सावो पावलोचा प्रदेश सुपीक जमिनीचा आहे.
२) पँटानल या दलदलीच्या प्रदेशात महाकाय ॲनाकोंडा आढळतात.
३) भारत हा जगातील एक विकसनशील देश आहे.
४) दूरध्वनी सेवा प्रथम कोलकाता येथे उपलब्ध करण्यात आली.


**प्र.२ योग्य जोड्या लावा.**

| | | |
|---|---|---|
| १) दादरा आणि नगर हवेली | – | केंद्रशासित प्रदेश |
| २) पाऊ ब्राझील | – | सदाहरित वने |
| ३) गुजरात | – | सिंह |
| ४) पॅराग्वे | – | ब्राझील उच्चभूमीचा भूभाग |

**प्र.३ एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही चार)**

१) भारतातील अंदमान-निकोबार द्वीपसमूहातल्या बॅरन बेटावर एकमेव जागृत ज्वालामुखी आहे.
२) ज्या प्रदेशात ठराविक काळात पाऊस पडतो त्या ठिकाणी वृक्षांची घनता कमी होत जाते.
३) वस्त्यांचे केंद्रीकरण पाण्याची उपलब्धता या बाबीशी केंद्रीत असते.
४) ब्राझीलमध्ये एकूण चार प्रमाणवेळा मानल्या जातात.
५) ब्राझील १८२२ साली स्वतंत्र झाला.

**प्र.४ अ) दिलेल्या भारताच्या नकाशा आराखड्यात पुढील घटक दाखवा. (कोणतेही चार)**




**आ) दिलेल्या नकाशाचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) दिलेल्या नकाशात लोकसंख्या वितरण टिंब पद्धतीने दाखवले आहे.

२) सावो पावलो आणि रिओ दी जनेरिओ या भागात लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर केंद्रीत झालेली आढळते.

३) रोराईमा, आमापा, पारा, ॲमेझोनास, आक्रे, रोन्डोनिया, टोकॅन्टिस, माटो ग्रासो, माटोग्रासो दो सुल.

४) ब्राझील देशातील लोकसंख्या वितरण हे असमान आहे. कारण ज्या प्रदेशात सुयोग्य हवामान, सुपीक जमीन, कृषी व उद्योग यांची भरभराट झालेली असते तसेच भरपूर पाणी पुरवठा असतो अशा ठिकाणी लोकसंख्या जास्त असते.
याउलट ब्राझीलमध्ये ॲमेझॉन नदीच्या खो-यात प्रतिकूल हवामान, जास्त पर्जन्यमान, दाट वने अशा ठिकाणी लोकसंख्या कमी आहे यामुळे हे घटक कारणीभूत असतात.

५) सावो पावलो या राज्यातील लोकसंख्येची घनता जास्त आहे.

प्र.५ **भौगोलिक कारणे लिहा. (कोणतेही दोन)**

१) १) उंचीनुसार ठिकठिकाणी वनस्पतींच्या प्रकारात विविधता असते. २) भारतीय हिमालयात उंचीनुसार वनांचे तीन प्रकार पडतात. ३) अति उंच प्रदेशात ५०० मिमीपेक्षा कमी पर्जन्यमान होते व त्या प्रदेशात फक्त हंगामी फुलझाडे असणारी वने आढळतात. ४) पश्चिम हिमालयाचा आंतरभाग शुष्क आहे. या भागात प्रामुख्याने झुडपे, सूचिपर्णी वृक्षांची वने आढळतात. देवदार, ओक, ॲश मॅपल, ऑलिव्ह इत्यादी वृक्ष आढळतात.

२) १) वाढती लोकसंख्या प्रदूषण व नागरीकरण यामुळे पर्यावरणाचा -हास होत आहे हे लक्षात आल्यानंतर पर्यावरणस्नेही पर्यटन ही संकल्पना पुढे झाली. २) पर्यटन करताना पर्यटकांकडून पर्यावरणाला हानी पोहचणार नाही, पर्यावरणाचा -हास होणार नाही याची काळजी घेतली जाते. ३) ब्राझीलमध्ये पर्यटकांची खूप गर्दी असते. ४) या पर्यटनाद्वारे पर्यटनथळी कचरा न टकणे, ध्वनीप्रदूषण टाळणे, वन्य पशुपक्ष्यांना इजा होणार नाही याची काळजी घेतली जाते.

३) १) कोणत्याही देशासाठी लोकसंख्या हे एक महत्त्वाचे संसाधन आहे. २) देशाच्या अर्थिक, सामाजिक प्रगतीसाठी लोकसंख्या व तिची गुणवत्ता हा महत्त्वाचा घटक आहे. म्हणून लोकसंख्या हे एक महत्त्वाचे संसाधन आहे.

४) १) भारताच्या पूर्व किना-यावर पूर्व घाट आहे. २) पूर्व किनारा हा नद्यांच्या संचयनाने बनला आहे. ३) गोदावरी, कृष्णा, कावेरी, महानदी यांसारख्या नद्या किना-यावरुन उपसागराला मिळतात. ४) या किना-यावर गाळाचे निक्षेपण जास्त आहे त्यामुळे किनारा उथळ आहे. ५) किनारा दंतूर नसेल तर तेथे नैसर्गिक बंदरे जास्त नसतात. म्हणून भारताच्या पूर्व किना-यावर नैसर्गिक बंदरे कमी आहेत.

प्र.६ अ) **दिलेल्या माहितीच्या आधारे बहुरेषालेख तयार करा. दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) २०१६ साली ब्राझील देशाचे राष्ट्रीय उत्पन्न सर्वाधिक होते. ते ८८४० डॉलर होते.

२) २०१३ साली भारताचे ब्राझीलशी झालेले व्यापार संतुलन सर्वात अनुकूल होते.

३) १९६० साली भारत देशाचे राष्ट्रीय उत्पन्न सर्वात कमी होते. ते ९० होते.

आ) **खालील आलेखाचे वाचन करून त्या खालची प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) उर्वरित ठिकाणांपेक्षा सगळयात शेवटी नोव्हेंबर महिन्यात चेन्नईत पावसाची सुरुवात होते, कारण हिमालयाच्या रांगांमधून परत फिरणा-या वा-यांमुळे तमिळनाडूमध्ये पावसाची सुरुवात होते.

२) दोन्ही राज्यात उन्हाळयात तापमान खूप जास्त असते तर हिवाळयात तापमान खूप कमी असते. दोघांमध्ये हे साम्य आहे.

३) मुंबई या शहराची तापमान कक्षा कमी आहे. त्यावरून असे समजते की मुंबईचे तापमान उष्ण आहे.

४) दिल्ली या शहराची तापमान कक्षा जास्त आहे. त्यावरून असे समजते की हिवाळयात वातावरण खूपच थंड असते (डिसेंबर-जानेवारी). तर उन्हाळयात वातावरण खूपच उष्ण असते (एप्रिल-जुलै).

५) मुंबई शहराची सरासरी कमाल व किमान तापमानकक्षा किमान १६° ते कमाल ३४° से आहे. मुंबई शहरातील पर्जन्याचे प्रमाण जून महिन्यात सुमारे ४५० मिमी व जुलै महिन्यात सुमारे ७२० मिमी आहे. म्हणजेच, मुंबईचे तापमान सर्वसाधारणपणे उष्ण व दमट आहे.

६) जून ते ऑक्टोबर या महिन्यात भारतात जास्त वृष्टी होते.

**प्र.७ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

१) १) भारत हा अशिया खंडातील देश आहे तर ब्राझील हा दक्षिण अमेरिका खंडातील देश आहे. २) भारत हा उत्तर व पूर्व गोलार्धामध्ये येतो व ब्राझील हा उत्तर व दक्षिण गोलार्धामध्ये येतो. ३) भारताचा अक्षवृत्तीय विस्तार ८°४ उत्तर ते ३७°७'उत्तर तर ब्राझीलचा अक्षवृत्तीय विस्तार ५°१५'उत्तर ते ३.३°४५ दक्षिण एवढा आहे. ४) भारताचा रेखावृत्तीय विस्तार ६८°पूर्व ते ९७°२५'पूर्व आहे तर ब्राझीलचा रेखावृत्तीय विस्तार ३४°४५' पश्चिम ७३°४८' एवढा आहे. ५) भारताच्या शेजारी पाकिस्तान, चीन, नेपाळ, बांगलादेश, भूतान इत्यादी देश आहेत तर ब्राझीलच्या शेजारी ऊरुग्वे, पेरू, अर्जेंटिना, कोलंबिया इत्यादी देश आहेत.

२) १) मानवी वस्ती प्रामुख्याने पाण्याची उपलब्धता, सुसह्य हवामान, सुपीक जमीन इत्यादी अनुकूल भौगोलिक परिस्थिती असणा-या ठिकाणी विकसित होते. २) भारतात सुद्धा हवामानातील भिन्नता, पाण्याच्या उपलब्धतेनुसार उत्तर भारतीय मैदानी प्रदेश, पूर्व किनारपट्टी, नर्मदेचे खोरे, विंध्य पठार व शेतीखाली असणारे भारतातील इतर प्रदेश या ठिकाणी केंद्रित वस्त्या आढळतात. ३) याउलट मध्य भारताचा वनाच्छादित भाग, राजस्थानचा पश्चिम भाग, हिमालयाचे पठार व विखंडित तसेच उंचसखल भागात मानवी वस्त्या विरळ व विखुरलेल्या आढळतात. ब्राझीलमध्ये प्रामुख्याने ब्राझीलच्या किनारी प्रदेशात वस्त्या विकसित झालेल्या आहेत. ४) किनारपट्टीवरील सम व दमट हवामान, मुबलक पाणीपुरवठा, साधनसंपत्तीची उपलब्धता, शेतीपूरक जमीन इत्यादीमुळे या भागात जमीन जरी कमी असली तरीही दाट वस्ती आढळते. उदा. सावो पावलो, उच्च भूमीचा प्रदेश, अवर्षणग्रस्त असल्याने या भागात शेतीचा विकास मर्यादित झाला आहे. ५) किना-याकडून ब्राझीलच्या अंतर्गत प्रदेशात ॲमेझॉन नदीच्या खो-यात मानवी वस्ती विरळ आहे. कारण रोगट हवामान, घनदाट जंगल, साधन संपत्तीचा वापर यांवर नैसर्गिक मर्यादा आहेत. या भागात वाहतुकीच्या सोई अतिशय मर्यादित स्वरूपात विकसित झालेल्या आहेत.

३) १) कचरा व्यवस्थापन हे अत्यंत महत्त्वाचे आहे. २) क्षेत्रभेटी दरम्यान बसमध्येसुद्धा कचरा व्यवस्थापन करावे लागेल. मुलांनी आणलेला खाऊ व त्यासाठी वापरलेले कागद किंवा प्लास्टिक एका पिशवित जमा कवावा. ३) मुलांना सूचना देऊन चॉकलेट किंवा कोणताही पदार्थ खाल्ला तर शक्यतो तो कचरा गाडीतून खाली न टाकता आपल्या बॅगमध्येच ठेवावा. ४) क्षेत्रभेटीच्या ठीकाणी कचरा टाकण्यासाठी जी केली असेल तेथे तो सर्व कचरा टाकू. ५) बसमध्ये कच-यासाठी एक पिशवी ठेवू जेणेकरून सर्व मुले तो कचरा त्याच पिशवीमध्ये टाकतील. ६) पर्यावरणाची कोणतीही हानी होणार नाही असेच आपले वर्तन असले पाहिजे अशा सूचना विद्यार्थ्यांना देऊन कच-याचे योग्य व्यवस्थापन करू.